| MHKO170007182013 | नियमित दिवाणी दावा १८०/२०१३<br>श्री. अजय जयवंतराव कदम<br>वि.<br>श्री. संतोष राजेंद्र कदम |
|---|---|

## नि. ५९ वरील आदेश

१. प्रतिवादी यांनी सदर अर्ज या प्रकरणात असलेले रामराव कदम यांचे उपलब्ध कागदपत्र हे पडताळणीसाठी Chief State Examiner Pune येथे पडताळणीकरिता पाठविण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी नि. ६३ येथे त्यांचे म्हणणे दाखल करून सदर अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे.

३. प्रतिवादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी सदरचा दावा दि. ०६.०४.१९७९ चे मृत्यूपत्राने त्यांना दिली असल्यामुळे त्या मृत्यूपत्राने आपण मालक कब्जेदार व वहिवाटदार झाल्याचे हक्कज्ञापन होवून मिळावे म्हणून दाखल केला आहे. तसेच वादी यांनी नि. ४७ सोबत अनु क्र. १ येथे अस्सल मृत्यूपत्र हजर केले असून ते मृत्यूपत्र रामराव गणपत कदम यांनी स्वतः लिहील्याचे कथन करून ते त्यांचे हस्ताक्षरात आहे व त्यांनी स्वतः लिहीले आहे असे कथन केले आहे. तसेच त्यावर त्यांची पत्नी मालतीबाई रामराव कदम हिचा अंगठा असल्याचे कथन केले आहे. मात्र तो खोटा आहे. तसेच सदरच्या दाव्यास प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि. २२ ला कैफियत देवून ते मृत्यूपत्र नाकारले आहे. तसेच मृत्यूपत्रातील हस्ताक्षर, सही व अंगठा नाकारला आहे व ते खोटे असल्याचे स्पष्टपणे कथन केले आहे. तसेच त्यामध्ये दावा मिळकतीचे मालकी, कब्जा अगर वहिवाटीशी हक्क अगर संबंध नसल्याचे कथन केले आहे. तसेच प्रतिवादी यांनी दावा मिळकतीबाबत दि. १५.०२.१९७८ रोजी पहिले व शेवटी मृत्यूपत्र लिहून ठेवल्याचे कथन केले आहे. तसेच सदरच्या मृत्यूपत्राने दावा मिळकत प्रतिवादी यांना दिल्याचे कथन केले आहे. तसेच सन १९७९ साली रामराव यांची शारिरीक व

मानसिक स्थिती चांगली नव्हती व दि. ०६.०४.१९७९ रोजी मृत्यूपत्र लिहून देणेसारखी स्थिती नव्हती व ते अंथरुणावर झोपून होते व त्यांना आपण काय करतो, काय नाही याची जाणीव फेब्रुवारी १९७९ पासून नव्हती व ते दि. ०९.१२.१९७९ ला आजारी स्थितीत मयत झाले असून त्यांची पत्नी मालतीबाई यांना फेब्रुवारी १९७९ च्या दरम्यान ऱ्हदयविकार व अर्धांगवायुचा झटका आलेला होता व त्यामुळे त्या शरिराची उजवी बाजू विकलांग झाल्याने चालू, बोलू शकत नव्हत्या असे स्पष्ट कथन केले आहे.

४. प्रतिवादी तर्फे वकील यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, फेब्रुवारी १९७९ पूर्वी त्यांची तब्येत चांगली होती व त्यांनी दि. १५.०२.१९७८ ला प्रतिवादी क्र. १ चे नावे पहिले व शेवटचे मृत्यूपत्र करून ठेवले होते. तसेच अशा प्रकारे सदरचा वाद हा मृत्यूपत्रावरून निर्माण झालेला वाद आहे व वादीच्या मृत्यूपत्रावरील हस्ताक्षर व सही नाकारली आहे. तसेच मयत रामराव कदम यांचे हस्ताक्षराचा नमुना तसेच त्यांचे पत्नीचा अंगठा, रामराव यांचे सहीचा नमुना आजही कागदोपत्री अस्तित्वात आहे. त्यामुळे वादी कथन करतात ते मृत्यूपत्र तसेच त्यातील हस्ताक्षर तसेच रामराव कदम यांची सही व मालतीबाईचा अंगठा या गोष्टींची सत्यता पडताळून पहाणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. तरी मयत रामराव गणपतराव कदम यांचे सदर मृत्यूपत्रातील हस्ताक्षर, सही तसेच मालतीबाई रामराव कदम यांचा अंगठा तसेच आज रोजी हजर केलेले रामराव कदम यांच्या सहीचे व हस्ताक्षराचे कागदपत्र व मालतीबाईचा अंगठा इत्यादी पडताळणीसाठी सदरचे कागदपत्र Chief State Examiner of Documents CID, Maharashtra State Chavan Nagar, Pashan Road, Pune यांचेकडे पाठविणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच सदर मृत्यूपत्राची पडताळणी झाल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही. उलटपक्षी सत्य वस्तुस्थिती ही मे. कोर्टाचे समोर येणार आहे. त्यामुळे सदर अर्ज प्रतिवादी यांनी दाखल केलेला आहे. प्रतिवादी तर्फे वकील यांनी दाखल करण्यात आलेल्या **किशन चंद वि. सिता राम ए. आय. आर २००५ पंजाब व हरियाणा १५६, गुरु गोविंद वि.देवारापू व्यंकटरामण्णा ए. आय. आर २००६ आंध्रप्रदेश ३७१, सरकार दिल्ली प्रशासन वि. पाली राम ए. आय. आर १९७९ सुप्रीम कोर्ट १४, पंचुलाल वि.**

**गणेशीलाल महेश्वरी ए. आय. आर १९७३ राजस्थान १२, गुलाब चंद वि. सत्य व्रत ए. आय. आर १९८३ अलाहाबाद ५४, सोहन लाल वि. लाला मंगी लाल ए. आय. आर १९८१ अलाहाबाद ६२** या न्यायनिर्णयांवर त्यांची भिस्त ठेवली. अंतिमतः प्रतिवादी तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा ही विनंती केली.

५. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, सदरचा अर्ज हा खोटा, चुकीचा व लबाडीचा आहे. वादी यांनी सदरचा दावा दि. २०.१२.२०१३ रोजी दाखल करून रामराव गणपतराव कदम यांनी वादीच्या लाभात दावा मिळकतीचे मृत्यूपत्र दि. ०६.०४.१९७९ रोजी करून दिले आहे. तसेच सदरचे मृत्यूपत्र वादी यांनी दि. २०.१२.२०१३ रोजी मे. कोर्टाच्या अभिलेखात दाखल केले असून प्रतिवादी क्र. १ व २ यांनी बारा वर्षामध्ये कैफियतीमध्ये मृत्यूपत्रावरील सही अगर हस्ताक्षर नाकारलेले नाही. यावरून प्रतिवादी क्र. १ व २ यांची लबाडी दिसून येते तसेच केवळ वादी यांना लवकर न्याय मिळू नये या हेतूने या अर्जाची रचना केली आहे. तसेच सदर प्रतिवादी यांनी केलेल्या अर्जातील मजकूर हा खोटा, चुकीचा लबाडीचा आहे. तसेच रामराव गणपतराव कदम हे फेब्रुवारी १९७९ पासून झोपून होते असे कथन केले आहे ते खोटे व चुकीचे असे आहे. कारण प्रतिवादी राजश्री राजेंद्र कदम हिचा विवाह सन १९८१ साली झाला असून प्रतिवादी संतोषचा जन्म त्यानंतर झालेला आहे. तसेच रामराव गणपतराव कदम हे दि. ०९.१२.१९७९ रोजी झाले आहेत. त्यामुळे प्रतिवादी राजश्री कदम व संतोष कदम यांनी रामराव गणपतराव कदम यांना लग्नापूर्वी पाहणेचा प्रश्नच येत नाही. तसेच प्रतिवादी राजश्री राजेंद्र कदम, राजेंद्र कदम यांनी कोणताही कायदेशीर अधिकार नसताना दावा मिळकत वादीच्या ताब्यात असताना बेकायदेशीर असे प्रतिवादी क्र. ३ यांच्या लाभात दि. १७.०१.२०११ रोजी करारपत्र करून दिले होते. तसेच त्या करारपत्रामध्ये रामराव गणपतराव कदम यांना राजेंद्र कदम हे एकमेव पुतणे सरळ व कायदेशीर वारस असून त्यांची पत्नी प्रतिवादी राजश्री राजेंद्र कदम हिनेही मान्यता दिलेली आहे. यावरुन प्रतिवादी राजश्री राजेंद्र कदम हिचा लबाडीपणा दिसून येतो कारण प्रतिवादी राजश्री राजेंद्र कदम हिचा विवाह सन १९८१ साली झालेला असताना

अर्जामध्ये दि. १५.०२.१९७८ च्या मृत्यूपत्राचा उल्लेख करतात. तसेच प्रतिवादी याने नि. ६० अनु क्र. १ वरील देवस्थान समितीकडे हजर केलेला अर्ज व त्यावरील अंगठा बनावट केला आहे तसेच अनु क्र. २ वरील कागदामध्ये रामराव गणपतराव कदम यांचे नाव नमूद नाही तसेच त्यावर त्यांची सही असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही तसेच अनु क्र. ३ वरील अर्ज हा रामराव गणपतराव कदम यांच्या हस्ताक्षरातील नाही अगर त्यावर रामराव गणपतराव कदम यांच्या हस्ताक्षरातील नाही अगर त्यावर रामराव गणपतराव यांची सही नाही. केवळ वादीच्या दाव्यास विलंब होणेचे हेतूने या अर्जाची रचना केलेली आहे. तसेच राजश्री राजेंद्र कदम हिने दावा मिळकतीबाबत प्रतिवादी क्र. ३ व वेगवेगळया सात इसमांना करारपत्र पुर्ण करून दिली असून सदर प्रतिवादी हिचे विरुद्ध मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कोल्हापूर मध्ये दावे प्रलंबित आहेत. त्यामुळे सदर दाव्याने दावा मिळकत वादीस प्राप्त होवू नये या दृष्ट हेतूने या अर्जाची रचना केली आहे. तसेच वादी यांनी दाव्यामध्ये रामराव कदम यांचे स्वतःचे हस्ताक्षरात मृत्यूपत्र असल्याचे कथन केलेले नाही. केवळ शपथपत्रात टायपिंग दोषामुळे नमूद झाले आहे. तसेच वादी यांना १९७९ चे मृत्यूपत्र कोणी लिहीले हे माहिती असण्याचे कारण नाही. तसेच प्रतिवादी हिचे विरुद्ध बरेचसे दावे प्रलंबित असून प्रतिवादीस खोटे व बनावट कागद करणेचे व्यसन आहे. वादी तर्फे वकील यांनी **मनोरामा नाईक वि. ओडिशा सरकार क्रिमिनल अपील क्र. ४२३/२०२२, रमेश चंद्र अग्रवाल वि. रेजेन्सी हॉस्पीटल लि. २००९ (३) एस. सी. सी. ऑनलाईन एस.सी १६२५, मुरारी लाल वि. मध्यप्रदेश सरकार १९७९ एस. सी. सी. ऑनलाईन एस.सी ४२७, एस. गोपाळ रेडडी वि. आंध्रप्रदेश सरकार (१९९६) ४ सुप्रीम कोर्ट केसेस ५९६, बाळकृष्णा दास अग्रवाल वि. श्रीमती. राधा देवी १९८८ एस.सी.सी ऑनलाईन ऑल ८६८** या न्यायनिर्णयांवर त्यांची भिस्त ठेवली. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

६. प्रतिवादी यांचा अर्ज, वादी यांचे म्हणणे व कागदपतरांचे अवलोकन केले.

७. मुळातच प्रस्तुत दाव्याचे अवलोकन काळजीपूर्वक केले असता ही गोष्ट दिसून येते

की सदरचा दावा हा वादी यांनी मृत्युपत्राच्या आधारे ते दावा मिळकतीचे मालक झालेले आहेत असे हक्कज्ञापन होऊन मिळणे करिता तसेच कायम मनाई करिता दाखल केलेला आहे. सदर कामी प्रतिवादी क्र.१ व २ यांनी हजर होऊन या दाव्यास कैफियत देऊन सदर दावा मिळकतीचे मूळ मालक रामराव कदम यांनी प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे मृत्युपत्र लिहून दिल्याचे व त्यामुळे त्या सदर दावा मिळकतीचे मालक झाल्याचे कथन करून दावा नाकारला आहे.

८. सदर दाव्यातील संपूर्ण वस्तुस्थितीचे व कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता त्यानुसार मुळातच २ मृत्युपत्रे दिसून येत आहेत. त्यापैकी एक वादी यांनी दाखल केल्याचे तसेच दुसरे हे प्रतिवादी क्र.१ यांनी दाखल केल्याचे दिसून येत आहे.

९. वास्तविकरित्या संपूर्ण दाव्यामध्ये वादी यांनी दाखल केलेले मृत्युपत्र व त्याच्या विरुद्ध प्रतिवादी क्र. १ यांनी दाखल केलेले मृत्युपत्र हाच या संपूर्ण प्रकरणाचा मूळ गाभा आहे असे दिसून येत आहे.

१०. सदर प्रकरणात वादी यांनी दावा दाखल करते वेळेपासूनच सदर मृत्युपत्राच्या अनुषंगाने हक्कज्ञापनाची दाद मागितल्याचे दिसून येत आहे. तसेच सदर दाव्यात सन २०१४ मध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी हजर होऊन त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. सदर कैफियतीमध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांनी दाखल केलेल्या मृत्युपत्राच्या अनुषंगाने दाद मागितलेली आहे. मुळातच सदरचे प्रकरण हे दि. १५ सप्टेंबर २०१७ रोजी वादी यांनी वेळेत पुरावा न दिल्यामुळे काढून टाकण्यात आलेले होते.

११. वादी यांनी या प्रकरणात मूळ मृत्युपत्र हे दि. ०१/१०/२०२४ रोजी अभिलेखावर दाखल केल्याचे दिसून येत आहे. मात्र नि. ४७ नुसार वादी यांनी नि. ३ लगत झेरॉक्स मृत्युपत्र हे दावा दाखल करतेवेळी हजर केल्याचे दिसून येत आहे.

मुळातच सदर कामी प्रतिवादी क्र. १ व २ हे सन २०१४ मध्ये दाव्यात हजर झाले तेव्हाच त्यांनी सदर पडताळणीच्या अनुषंगाने का दाद मागितली नाही याचे कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी दाखल केलेल्या अर्जावरून समजून येत नाही. सदर प्रकरण आधी मी उल्लेख केल्याप्रमाणे वादी यांनी दाखल केलेले मृत्युपत्र व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी या कामी दाखल केलेले मृत्युपत्र हेच या प्रकरणाचा एक महत्वपूर्ण भाग होत असेल तर सदर कामी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी तात्काळ सन २०१४ मध्ये याबाबत पडताळणीची दाद का मागितली नाही याचे कोणतेही स्पष्टीकरण दिसून येत नाही. तसेच सदर प्रकरणांमध्ये वादी यांनी पुरावा दाखल केल्यानंतर सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

१२. तसेच सदर अर्जाच्या अनुषंगाने वादी यांनी खाजगी न्यायसहायक प्रयोगशाळा यांचा तपासणी अहवाल दाखल केलेला आहे. सदर अहवालाची पाहणी केली असता त्यामध्ये प्रतिवादी यांनी हजर केलेल्या मृत्युपत्रावरील रामराव कदम यांची सही व त्यांनी केलेल्या इतर खरेदीपत्रातील सह्यांमधे तफावत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. तसेच खाजगी न्यायसहायक प्रयोगशाळेकडून अहवाल प्राप्त झाला, तसेच केवळ ती प्रयोगशाळा खाजगी आहे, एवढ्याच कारणाकरिता सदरचा अहवाल हा नाकारता येणार नाही. तसेच मुळातच सदर प्रकरणातील वादी यांनी दाखल केलेल्या मृत्यूपत्राची व प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दाखल केलेल्या मृत्यूपत्राची सत्यासत्यता व त्याची शाबिती ही अंतिमतः सुनावणी नंतरच होणारी आहे.

१३. मुळातच सदर अर्ज हा प्रतिवादी यांनी बऱ्याच वर्षाच्या कालावधीनंतर त्यांना संधी असून देखील दाखल केलेला आहे असे वाटते.

१४. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या **किशन चंद वि. सिता राम ए. आय. आर २००५ पंजाब व हरियाणा १५६** या न्यायनिर्णयामध्ये वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुद्ध दावा मिळकतीचा कब्जा हा करार पत्राची अंमलबजावणी करून मिळणे करिता दाखल

केलेला होता.

सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

१५. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या **गुरु गोविंद वि. देवारापू व्यंकटरामण्णा ए. आय. आर २००६ आंध्रप्रदेश ३७१** या न्यायनिर्णयामध्ये सामनेवाला याने मूळ दावा प्रॉमिसरी नोट च्या आधारे रक्कम वसुली करणे करिता दाखल केलेला होता.

सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

१६. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या **सरकार दिल्ली प्रशासन वि. पाली राम ए. आय. आर १९७९ सुप्रीम कोर्ट १४** या न्यायनिर्णयामध्ये मूळ प्रकरण हे सत्र न्यायालय यांचेकडे कार्यक्षेत्र असणारे होते. सदर प्रकरणात न्यायदंडाधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार चौकशी सुरू केली. सरकार पक्षाचा पुरावा नोंदवून झाल्यानंतर सरकार पक्षामार्फत अर्ज सादर करण्यात आला. तसेच सदर अर्जानुसार आरोपी याचे हस्ताक्षर तसेच त्याची सही ही तपासणी करण्यासाठी पाठविण्याची मागणी करण्यात आलेली होती.

सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

१७. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या **पंचुलाल वि. गणेशीलाल महेश्वरी ए. आय. आर १९७३ राजस्थान १२** या न्यायनिर्णयामध्ये वादी याने प्रतिवादी याने त्याचे कडून उधार घेतलेले ४७०/– रुपये त्याला परत केले नाही म्हणून दावा दाखल केला होता.

सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

१८. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या **गुलाब चंद वि. सत्य व्रत ए. आय. आर १९८३ अलाहाबाद ५४** या न्यायनिर्णयामध्ये वादी यांनी सदरचा दावा हा हुंडीच्या आधारे रक्कम वसुली करिता दाखल केलेला होता.

सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

१९. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या **सोहन लाल वि. लाला मंगी लाल ए. आय. आर १९८१ अलाहाबाद ६२** या न्यायनिर्णयामध्ये प्रतिवादी यांनी रक्कम रु.१२००० च्या वसुलीसाठी प्रॉमीसरी नोट च्या आधारे दावा दाखल केला होता.

सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

२०. वादी यांनी दाखल केलेल्या **मनोरामा नाईक वि. ओडिशा सरकार क्रिमिनल अपील क्र. ४२३/२०२२ या न्यायनिर्णयामध्ये** न्यायदंडाधिकारी, पुरी यांनी भारतीय दंड विधान संहिता यांनी घेतलेल्या दादीच्या अनुषंगाने प्रकरण दाखल करण्यात आलेले होते.

सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

२१. वादी यांनी दाखल केलेल्या **रमेश चंद्र अग्रवाल वि. रेजेन्सी हॉस्पीटल लि. २००९ (३) एस. सी. सी. ऑनलाईन एस.सी १६२५** या न्यायनिर्णयामध्ये मूळ तक्रारकर्ता हा शिक्षक म्हणून नोकरी करत होता. त्याला पाठ दुखी तसेच चालण्यास अडचणी येत असल्यामुळे रीजन्सी हॉस्पिटल येथे त्याने वैद्यकीय तपासणी केली. तसेच वैद्यकीय तपासणी नुसार त्याचे ऑपरेशन करण्यात आले होते. त्यानंतर देखील सुधारणा न झाल्यामुळे दुसऱ्या डॉक्टरांनी त्याचे पुन्हा एकदा ऑपरेशन केले. मात्र तरी देखील त्याचे मध्ये सुधारणा न झाल्यामुळे त्याचे पुन्हा तिसरे ऑपरेशन करण्यात आले होते. सदर प्रकरणात तक्रारकर्ता याने राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारणा आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

२२. वादी यांनी दाखल केलेल्या **मुरारी लाल वि. मध्यप्रदेश सरकार १९८० सुप्रीम कोर्ट ३३०** या न्यायनिर्णयामध्ये मुरारीलाल याला भारतीय दंडविधान संहिता कलम ३०२ प्रमाणे दोषी ठरवून फाशीची शिक्षा देण्यात आलेली होती. तसेच मुरारीलाल याला भारतीय दंडविधान संहिता कलम ४६० अन्वये तसेच ३९४ व ३९७ अन्वये देखील सक्तमजुरीची शिक्षा प्रत्येकी सात वर्षाकरिता देण्यात आलेली होती. याबाबत मुरारीलाल यांनी मा. मध्य प्रदेश उच्च न्यायालय यांच्याकडे अपील दाखल केले असता, फाशीची शिक्षा ही जन्मठेपेमध्ये बदलण्यात आली होती. सदरबाबत मुरारीराल यांनी पुन्हा मा. सर्वोच्च न्यायालय यांच्याकडे अपील दाखल केले.

सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

२३. वादी यांनी दाखल केलेल्या **गोपाळ रेडडी वि. आंध्रप्रदेश सरकार १९९६ सुप्रीम कोर्ट ७९२** या न्यायनिर्णयामध्ये अपीलकर्ता तसेच त्याच्या भावावर भारतीय दंड विधान संहिता कलम ४२० तसेच हुंडा प्रतिबंधक कायदा कलम ४ प्रमाणे खटला चालविण्यात आलेला होता.

सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

२४. वादी यांनी दाखल केलेल्या **बाळकृष्णा दास अग्रवाल वि. श्रीमती. राधा देवी १९८८ एस.सी.सी ऑनलाईन ऑल ८६८** या न्यायनिर्णयामध्ये रतनलाल यांच्या पत्नीने व लहान मुलांनी दावा मिळकतीची वाटणी होण्याकरिता सदरचा दावा दाखल केला होता.

सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

२५. एकंदरीतच सर्व वस्तुस्थितीची कारणमीमांसा केली असता सदर कामी प्रतिवादी यांनी दाखल केलेला अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे, असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**प्रतिवादी यांचा नि.५९ वरील अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात आलेला आहे.**

सही/-
**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

पन्हाळा
दि. २४.०४.२०२६